# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३७२–२०१०–११/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. ज्ञानू धुळा हक्के ,<br>मु. पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बंडा संतु भडके, मु. पो. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये दि. ११.१.२०११ ला गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपले घर क्र. २६६ मध्ये घरगुती वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. १९.१०.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला. आजतागायत चलन मिळाले नाही. ग्राहकाने तक्रार क्र. ६१२ दि. २२.१०.२०१० नुसार अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दाखल केली. त्यामध्ये दि. १.११.२०१० ला आदेश झाले.

ग्राहकाने आपल्या गाऱ्हाण्यात अंतर्गत कक्षाचा आदेश मान्य तथापी मा. आयोगाच्या कृती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल केली असल्याचे म्हटले आहे. वीज मंजुरी मिळावी व ती देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वि.प.ने नोटीस देवूनही दि. ३१.१.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल / म्हणणे दिले नाही. ते दि. ४.३.२०११ रोजी दिले. त्यामध्ये ग्राहकाचा नवीन घरगुती कनेक्शनसाठी दि. २१.१०.२०१० रोजी अर्ज प्राप्त झाला व त्यांना दि. १०.२.२०११ रोजी चलन देण्यात आलेले आहे. तरी ग्राहकाने मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ७.३.२०११ ला सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधींनी अंतर्गत कक्षाने आदेश देवूनही ग्राहकास चलन दिले नाही, जे चलन दिले ते मुदतीनंतर दिले त्यामुळे भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले.

कृती मानके विनियम २००५ नुसार तक्रारदार ग्राहकास १ महिन्यात म्हणजे दि. १८.११.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक आहे. ते विलंबाने दि. १०.२.२०११ ला देण्यात आले. विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण वि.प.ने दिले नाही. वि.प.ने कृती मानकाची पूर्तता करण्यात दूर्लक्ष केल्याने भरपाई देणेची वि.प.ची जबाबदारी आहे, ग्राहकाचा तो हक्क आहे. त्यामुळे ग्राहकाची तक्रार मंजूर करण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने ग्राहकास दि. १८.११.२०१० ते दि. १०.२.२०११ या कालावधीतील ११ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ११००/– भरपाई ग्राहकास द्यावी. सदर भरपाईच्या रकमेचे वीज जोडणीनंतर समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम रोखीने द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच
कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३७२–२०१०–११/ दिनांक :

श्री. ज्ञानू धुळा हक्के ,
मु. पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

२) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
४) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. ज्ञानू धुळा हक्के , मु. पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये दि. ११.१.२०११ ला गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने आपले घर क्र. २६६ मध्ये घरगुती वीज पुरवठा मिळावा यासाठी दि. १९.१०.२०१० रोजी वि.प.कडे अर्ज केला. आजतागायत चलन मिळाले नाही. ग्राहकाने तक्रार क्र. ६१२ दि. २२.१०.२०१० नुसार अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे रितसर तक्रार दाखल केली. त्यामध्ये दि. १.११.२०१० ला आदेश झाले.

ग्राहकाने आपल्या गाऱ्हाण्यात अंतर्गत कक्षाचा आदेश मान्य तथापी मा. आयोगाच्या कृती मानकांची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल केली असल्याचे म्हटले आहे. वीज मंजुरी मिळावी व ती देण्याबाबत झालेल्या विलंबाबाबत कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

वि.प.ने नोटीस देवूनही दि. ३१.१.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल / म्हणणे दिले नाही. ते दि. ४.३.२०११ रोजी दिले. त्यामध्ये ग्राहकाचा नवीन घरगुती कनेक्शनसाठी दि. २१.१०.२०१० रोजी अर्ज प्राप्त झाला व त्यांना दि. १०.२.२०११ रोजी चलन देण्यात आलेले आहे. तरी ग्राहकाने मागितलेली नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ७.३.२०११ ला सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे श्री. टिळक, सहाय्यक अभियंता व श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. ग्राहक प्रतिनिधींनी अंतर्गत कक्षाने आदेश देवूनही ग्राहकास चलन दिले नाही, जे चलन दिले ते मुदतीनंतर दिले त्यामुळे भरपाई मिळावी अशी मागणी केली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी विलंब झाल्याचे मान्य केले.

अंतर्गत कक्षाचे आदेश दि. १.११.२०१० ला झाल्यानंतर ग्राहकाने प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०११ मंचामध्ये दाखल केली. विनियम २००६ चे कलम ६.४ मधील तरतुदीनुसार २ महिन्यात गाऱ्हाणे दाखल करणे जरुरी होते. ग्राहकाने आपल्या तक्रारीत कक्षाचे आदेश मान्य आहेत, तथापि मा. विद्युत नियामक आयोगाच्या कृती मानकाची अंमलबजावणी होत नाही म्हणून तक्रार दाखल केली आहे असे म्हटले आहे. मंचाचे असे मत झाले आहे की, यामुळे ६.४ मधील २ महिन्याचा कालावधी पुढे ढकलता येणार नाही. ग्राहकाने अंतर्गत कक्षाचे आदेश झाल्यानंतर दोन महिन्याचे कालावधीमध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली पाहिजे. म्हणजेच याचा अर्थ विनियम २००६ नुसार गाऱ्हाणे २ महिन्यात मंचाकडे दाखल करणे अपेक्षित आहे. प्रस्तुत तक्रार ही १० दिवस विलंबाने दाखल केल्याने मुदतबाह्य ठरते व ती फेटाळणे योग्य ठरते असे मंचाचे मत झाले आहे.

# आदेश

१) तक्रार मुदतबाह्य असल्याने फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.